सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

संदर्भ : रासेयो/२०२५–२६/५७३ दि. २४/०२/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : विश्व मराठी संमेलन २०२६ या कार्यक्रमामध्ये रासेयो विद्यार्थी व प्राध्यापक यांनी सहभागी होण्याबाबत...

संदर्भ : मा. संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, मुबंई यांचे क्र.रामविसं/विश्वमसं/प्र.क्र.४३/प्रकल्प३/२०२६,दि.२२ फेब्रुवारी २०२६ रोजीचे पत्र

महोदय,

मा. संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, मुबंई यांच्या पत्रान्वये मराठी ही महाराष्ट्र राज्याची राजभाषा असून ती महाराष्ट्राची लोकभाषा, ज्ञानभाषाही आहे. मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, संवर्धन यांची व्याप्ती महाराष्ट्र राज्यापुरती न राहता त्याची कक्षा देशभरात तसेच अन्य देशातही विस्तारावी ह्या हेतूने मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन ह्यांच्या द्वारे जगभरातील मराठी भाषक, मराठी–भाषा–प्रेमी आणि मराठी–भाषा–हितेच्छू ह्यांचे विश्व मराठी संमेलन आयोजित करण्यात येत असते.

त्यानुसार यावर्षीही दि. २६, २७, २८ फेब्रुवारी आणि ०१ मार्च २०२६ या कालावधीत मराठा विद्या प्रसारक समाजाचे के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक याठिकाणी विश्व मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. याअनुषंगाने सदर कालावधीत भाषा, साहित्य, उद्योजकता, उपक्रमशीलता अशा विविध आयामांवर आधारित कार्यक्रम, परिसंवाद, चर्चासत्रे, मुलाखती, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींचे आयोजन करण्यात येणार आहे.

तरी, सदर संमेलनात आपल्या महाविद्यालयातील अधिकाधिक रासेयो स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी यांना सहभागी होण्याविषयी सूचित करण्यात यावे. कळावे, ही विनंती.

Bhame.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत: मा. संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, मुबंई यांचे पत्र

नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग

**राज्य मराठी विकास संस्था**

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,

धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६

संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

क्र. रामविसं/विश्वमसं/प्र.क्र.४३/प्रकल्प३/२०२६

दि. २२.०२.२०२६

प्रति,

मा. संचालक,

राष्ट्रीय सेवा योजना,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**विषय – विश्व मराठी संमेलन २०२६ या कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी सहभागी होण्याबाबत.**

महोदय,

मराठी ही महाराष्ट्र राज्याची राजभाषा असून ती महाराष्ट्राची लोकभाषा, ज्ञानभाषाही आहे. मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, संवर्धन ह्यांची व्याप्ती महाराष्ट्र राज्यापुरती न राहता त्याची कक्षा देशभरात तसेच अन्य देशांतही विस्तारावी ह्या हेतूने मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन ह्यांच्या द्वारे जगभरातील मराठी भाषक, मराठी-भाषा-प्रेमी आणि मराठी-भाषा-हितेच्छू ह्यांचे विश्व मराठी संमेलन आयोजित करण्यात येत असते.

ह्या वर्षी दि. २६, २७, २८ फेब्रुवारी आणि ०१ मार्च २०२६ या कालावधीत मराठा विद्या प्रसारक समाजाचे के.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक येथे विश्व मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. याअनुषंगाने उपरोक्त कालावधीत विविध भाषाविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यांत भाषा, साहित्य, उद्योजकता, उपक्रमशीलता, इ. विविध आयामांवर आधारित असे कार्यक्रम, परिसंवाद, चर्चासत्रे, मुलाखती, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींचा समावेश असणार आहे.

तरी, सदर संमेलनात आपल्या विद्यापीठातील नाशिक शहर आणि जिल्ह्यातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी व प्राध्यापक यांना कार्यक्रमनिहाय नियोजन करून संमेलनात चारही दिवस सहभागी होण्याबाबत आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

आपला,

(डॉ. शामकांत देवरे)

संचालक

राज्य मराठी विकास संस्था

प्रत माहितीसाठी,

१. मा. सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री, मराठी भाषा यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई